आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ५९ वा ● शुक्रवार दि. २२ ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




# उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाकडून निरीक्षकांची नियुक्ती

मुंबई, : भारतीय संविधानातील कलम ३२४ अंतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून भारताच्या निवडणूक आयोगाने (एउख) उपराष्ट्रपती निवडणूक २०२५ साठी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या कार्यक्रमानुसार, उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर २०२५ रोजी मतदान व मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून सुशीलकुमार लोहानी, आयएएस (ओडिशा कॅडर : १९९५), अतिरिक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय आणि डी. आनंदन, आयएएस (सिक्कीम कॅडर : २०००), अतिरिक्त सचिव, वित्त मंत्रालय (व्यय विभाग) यांची नियुक्ती केली आहे.

याशिवाय, नितीनकुमार शिवदास खाडे, आयएएस (आसाम–मेघालय कॅडर : २००४), संयुक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय (भूमी संसाधन विभाग) यांना राखीव यादीत स्थान देण्यात आले आहे.

उपराष्ट्रपती निवडणुकीचे संपूर्ण आयोजन पारदर्शक आणि सुरळीत पार पडावे, यासाठी निवडणूक आयोगाकडून या नियुक्ती करण्यात आल्या असल्याचे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाराष्ट्र सदनात लवकरच स्वयंसहायता गटांचे दालन नवी

दिल्ली, : राजधानी दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील स्वयं सहायता गटांच्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी एक स्वतंत्र दालन सुरू करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला तसेच संबंधित यंत्रणांना दिले.

ग्रामविकास मंत्री गोरे हे दिल्ली दौऱ्यावर आहेत. यावेळी निवासी आयुक्त यांनी प्रस्तावित केलेल्या बचतगट वस्तू प्रदर्शन व विक्री दालनबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच श्री. गोरे यांनी प्रस्तावित जागेची पाहणी देखील केली. यावेळी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार उपस्थित होत्या.

महाराष्ट्र सदनात येत्या काळात बचतगटातील महिलांसाठी फिरते दालन उपलब्ध करून दिले जाईल. या दालनात गृहोपयोगी तसेच सजावटीच्या आणि वाळवणाच्या वस्तू यासह एक जिल्हा उत्पादन, भौगोलिक मानांकन असणारे उत्पादन अशा वस्तू राहतील. यामुळे महाराष्ट्रातील महिलांना राजधानीत व्यासपीठ उपलब्ध होईल असे श्रीमती विमला यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री श्री. जयकुमार गोरे यांनी या उपक्रमासाठी सकारात्मकता दर्शविली असून स्वयं सहायता गटांचे दालन महाराष्ट्र सदनात सुरु करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधिताना सूचित देखील केले.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडून पूरग्रस्तांसाठी तातडीने मदत साहित्य उपलब्ध

नांदेड : जिल्ह्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी तातडीने औषधे व जीवनोपयोगी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. शासनासह विविध सामाजिक संस्थांच्यावतीनेही मदतीचा ओघ पूरग्रस्त गावातील नागरिकांसाठी सुरू आहे.



मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या प्रभाव क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे मुक्रमाबाद, हसनाळ, रावणगाव, भिंगोली, भासवाडी या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. या पुराच्या पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरून जीवनावश्यक वस्तू व साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दरम्यान, पालकमंत्री अतुल सावे यांनी पूर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन पूरग्रस्तांसाठी मदत साहित्य उपलब्ध करून दिले आहे. हे साहित्य देगलूरचे उपविभागीय अधिकारी व मुखेडचे तहसीलदार यांना वितरणासाठी सुपूर्द केले असून, त्यांच्यावतीने पूरग्रस्तगावांमध्ये या साहित्याचे वितरण करण्यात येत आहे. या साहित्यात प्रामुख्याने दैनंदिन वापरातील कपडे साडी, टीशर्ट, ट्रॅकपँट, टॉवेल, आणि जीवनावश्यक औषधे पॅरासीटामॉल टेबलेट स्ट्रिप, ओआरएस इ. साहित्याचा यामध्ये समावेश आहे.

# शासकीय सेवेच्या माध्यमातून जनसेवेचे कार्य करावे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने आपल्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. शासनामध्ये अधिकारी म्हणून काम करत असताना जनतेची सेवा प्रामाणिकपणे करावी. शासकीय सेवेच्या माध्यमातून जनसेवेचे कार्य आपल्या हातून घडावे, असा दृष्टीकोन बाळगण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून समाज कल्याण अधिकारी (गट–ब) पदावर निवड झालेल्या २२ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमास सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ–मुंडे, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार, बार्टीचे महासंचालक सुनील वारे तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सामाजिक न्याय विभाग हा समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करणारा महत्त्वाचा विभाग आहे. समाजातील शेवटच्या घटकाची सेवा करण्याची संधी या विभागात काम करताना मिळते. समाजातील सर्व घटक जोपर्यंत मुख्य प्रवाहात येत नाहीत तोपर्यंत आपण सर्वांगीण विकासाचे स्वप्न पूर्ण करू शकणार नाही. आपण सर्व अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करून समाजातील शेवटच्या घटकाच्या आयुष्यात परिवर्तन घडविण्याचे कार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, शासकीय सेवेत आल्यामुळे आपल्यावरील जबाबदारी वाढली आहे. जनतेप्रती प्रामाणिक राहून जनतेची सेवा करण्याचे कार्य आपल्या हातून होणार आहे. या संधीचे आपण सोने करावे, असे आवाहनही श्री. शिरसाट यांनी यावेळी केले.

# जीआय नामांकन प्राप्त पिकांच्या पॅकेजींग व ब्रॅंडींगसाठी मदत करण्यास शासन सकारात्मक फलोत्पादन मंत्री – भरत गोगावले

पुणे : राज्यामध्ये उत्पादित होत असलेल्या फळ पिकाची निर्यात वाढविण्यासाठी फळ पिकाचे क्लस्टर वाढवावेत तसेच जीआय नामांकन प्राप्त पिकांच्या पॅकेजींग व ब्रॅंडींगसाठी मदत करण्यास शासन सकारात्मक असून त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्यात यावा, अशा सूचना राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खार भूमि विकास मंत्री भरत गोगावले यांनी केले.

साखर संकूल येथे आयोजित राज्यातील फलोत्पादन विभागाच्या आढावा बैठकीत श्री. गोगावले बोलत होते. बैठकीस कृषि आयुक्त डॉ. हेमंत वसेकर, संचालक, विस्तार व प्रशिक्षण रफिक नाईकवाडी, संचालक कृषिप्रक्रिया व नियोजन विनयकुमार औटे आदी उपस्थित होते.

श्री. गोगावले म्हणाले, प्रत्येक विभागाची भौगोलिक परिस्थिती बघून त्यानुसारच कामकाज करावे. फलोत्पादन वाढीसाठी नाविन्य पूर्ण उपक्रम राबवून विभागाचा महसूल वाढवावा. राज्यातील फलोत्पादनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. शासनाच्या रोपवाटीका बळकट करण्यासाठी



काय उपाययोजना करण्यात येतील याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. प्रत्येक रोपवाटिकेस काही ठरावीक खेळते भांडवल ठेवता येईल का या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव शासनास सादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

कोकणामध्ये मोठया प्रमाणावर सुपारीची लागवड होत आहे. परंतू सुपारी पीक भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेमध्ये समाविष्ठ नाही. या पिकाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात यावा. महाराष्ट्र ग्रामीण हमी योजनेंतर्गत परमीटवर शेतकऱ्यांच्या कलमे–रोपे पुरवठा केल्यानंतर त्याची कुशलची रक्कम शासकीय रोपवाटीकेस देण्या संदर्भात व खजूर या पिकाचा समावेश या योजनेमध्ये करण्याबाबत शेतकऱ्यांची मागणी असल्याने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना श्री. गोगावले यांनी दिल्या.

बैठकीत विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सविस्तर आढावा संचालक फलोत्पादन अंकुश माने यांनी तर व्यवस्थापकीय संचालक अशोक किरनळ्ळी, यांनी महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि वनऔषधी वनस्पती मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनां संदर्भात सादरीकरण केले.

या बैठकीस ठाणे, नाशिक, पुणे छत्रपती संभाजीनगर, लातूर, विभागांचे विभागीय कृषि सह संचालक उपस्थित होते तर अमरावती व नागपूर विभागाचे कृषि सहसंचालक दूरदुष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहायता निधीमुळे दुर्धर आजारावर झाला उपचार

यवतमाळ, (जिमाका) : मुख्यमंत्री सहायता निधी अनेक रुग्णांसाठी आधार ठरला आहे. जिल्ह्यात योजनेचा कक्ष सुरु झाल्यापासून हा निधी मिळविणे अधिक सोपे आणि कमी त्रासाचे झाले आहे. जिल्ह्यातील अनेक रुग्णांना या कक्षाचा लाभ झाला असून दोन रुग्णांच्या जटील शस्त्रक्रियांसाठी कक्षाच्या निधीने मोठा दिलासा दिला आहे.




सर्वसामान्य गरीब कुटुंबातील रुग्ण दुर्धर आजारांवर उपचार किंवा शस्त्रक्रिया करू शकत नाही. असे आजार झाल्यास त्यांना खरा प्रश्न पडतो, यासाठी येणारा खर्च करायचा कसा. अशा रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष मोठा आधार देणारा ठरला आहे. अनेक रुग्णांना या कक्षाने वैद्यकीय मदतीचा हात दिला. गेल्या महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयातच कक्ष सुरु झाल्याने रुग्णांना अधिक फायद्याचे ठरत आहे.

यवतमाळ येथील जितेंद्र मनोहर श्रीवास हे ५० वर्षाचे नागरिक आहेत. त्यांच्या मेंदुत संसर्ग झाल्याने गेल्या अनेक दिवसांपासून ते नागपूर येथील मेयो रुग्णालयात भरती होते. त्यांना उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची चिंता होती. विविध ठिकाणी प्रयत्न करूनही त्यांना उपचारासाठी खर्चाची आवश्यक रक्कम जुळविता येत नव्हती. पानठेल्याचा व्यवसाय असल्याने त्यांचे उत्पन्नही जेमतेम होते. कोणत्याही योजनेतून आजारासाठी रक्कम मिळत नसल्याने त्यांना मुख्यमंत्री सहायता कक्षाबाबत समजले. त्यांनी लगेच अर्ज केला आणि त्यांना उपचारासाठी ५० हजार रुपयांची रक्कम तातडीने मंजूर करण्यात आली. या मदतीने ते आपल्या मेंदूतील संसर्गावर उपचार करु शकले.

झरी जामणी तालुक्यातील आंबेझरी या अतिशय दुर्गम गावातील विनोद मधुकर शिंदे यांना क्रॅानिक मायलॉइड ल्युकेमिया हा आजार होता. अनेक दिवसांपासून ते या आजाराशी झुंजत होते. वर्षाला यासाठी त्यांना बराच खर्च येत होता. मुख्यमंत्री सहायता कक्षास मदतीसाठी अर्ज केल्यानंतर त्यांना ५० हजार रुपयांचे सहाय्य उपचारासाठी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता कक्षाच्या मदतीने आजारावर उपचार करता आले. हा कक्ष अतिशय चांगला असून रुग्णांना आधार देणारा असल्याचे या दोनही रुग्णांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करतांना सांगितले.

वैद्यकीय उपचार, शस्त्रक्रियेच्या मदतीसाठी रुग्ण जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षास संपर्क साधू शकतात किंवा ह्रींींि://लीष.ारहरीरीहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्जासोबत आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, राशन कार्ड, वैद्यकीय अहवाल, खर्चाचे अंदाजपत्रक जोडणे आवश्यक असते. मदतीच्या लाभासाठी रुग्ण राज्याचा निवासी व त्याचे उत्पन्न एक लाख ६० हजारापेक्षा कमी असावे.

# राज्य महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचआयोजन

लातूर, (विमाका): राज्यात साजरा होणारा गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ङ आशिष शेलार यांनी केली. महोत्सवांतर्गत, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा, तालुका या तीनही स्तरांवर होणार आहे. या स्पर्धेचे अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या ह्रींींि://.श्रिवशीहरिपवशङ्गरश्रररलरवशॄ.ास या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ह्रींींि://सरपशीह्रीींर्ी.श्रिवाङ्गर.ले.ळप या पोर्टलद्वारे ऑनलाईन स्वरुपात स्वीकारले जाणार आहे. स्पर्धेचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट, २०२५ असून, ही स्पर्धा विनामूल्य आहे. नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

विजेत्या मंडळांना तालुकास्तरावर एक, जिल्हा व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांनी **(पान २ वर)...**

# शेत/ पाणंद रस्ते मजबुतीकरणाच्या शिफारशीसाठी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन

मुंबई, : शेत/ पाणंद रस्ते यांचे मजबुतीकरण करण्यासंदर्भात समग्र योजना तयार करण्यासाठी महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचे निर्देश/ सूचना तपासून समितीस शिफारस करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे.




या अभ्यासगटामध्ये अपर मुख्य सचिव (जलसंपदा); अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम); प्रधान सचिव (ग्रामविकास); प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग; सचिव/ प्रधान सचिव (रोजगार हमी योजना); यशदाचे महासंचालक निरंजनकुमार सुधांशु; जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख; सह/ उपसचिव विधी व न्याय विभाग; उपसचिव (जमीन–१अ) महसूल व वन विभाग हे समितीचे सदस्य तर, सह सचिव (ल–१), महसूल व वन विभाग, मंत्रालय हे समितीचे सदस्य सचिव राहतील.

हा अभ्यासगट अस्तित्वात असलेल्या शेत व पाणंद रस्ते योजनांचा अभ्यास करणे; नागपूर, अमरावती व लातूर जिल्ह्यांमध्ये शेत रस्त्यांबाबत राबविण्यात आलेल्या योजनांचा अभ्यास करणे; जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करणे; शेत/ पाणंद रस्ते योजना राबविण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष ठेवावे किंवा कसे?, सध्या अस्तित्वात असलेल्या योजनेनुसार Convergence ने योजना पूर्ण होते किंवा कसे?, त्याकरिता कोणत्या लेखाशीर्षातून किती निधी उपलब्ध करावा, याचे निश्र्चित परिमाण ठरविणे; सदर योजना कोणत्या विभागामार्फत राबवावी याबाबत अभ्यास करणे; महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीचे निर्देश/ सूचना कायदेशिररित्या तपासून अहवाल सादर करणे या मुद्यांचा अभ्यास करून महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीस वेळोवेळी अहवाल सादर करेल.

समितीचे अध्यक्ष अपर मुख्य सचिव (महसूल) यांना विशेष निमंत्रित म्हणून त्यांना योग्य वाटेल अशा अधिकारी/ सेवानिवृत्त अधिकारी किंवा तज्ज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तसेच वर नमूद कार्यकक्षेव्यतिरिक्त आणखी काही शिफारशी करावयाच्या असल्यास समितीस स्वातंत्र्य राहील. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

# गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय

मुंबई, : यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारितील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना व एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे.



यासाठी गणेशोत्सव २०२५ – कोकण दर्शन या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक व वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस व वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठी देखील हेच पास ग्राह्य धरले जाणार आहेत. ते शासनाच्या आदेशानुसार ग्रामीण व शहरी पोलीस तसेच प्रादेशिक परिवहन विभागाने पास वाटपाचे समन्वय साधून प्रवाशांना वेळेत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच या संदर्भात जाहीरात व सूचना प्रसिद्ध करून जनतेला माहिती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

हा निर्णय कोकणात जाणाऱ्या लाखो भाविकांच्या प्रवासाला मोठा दिलासा ठरणार आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन

भोकर / प्रतिनीधी/ मागील १४ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना नियमित सेवेत समायोजन करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित झाला. यास सव्वा वर्ष कालावधी होऊन अद्यापही राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजनचा शासन निर्णय घेत नाही तसेच मानधन वाढ, रॉयल्टी, बोनस, बदली धोरण मान्य होत नसल्याने तसेच मा.आरोग्य मंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी दि. ८ व १० जुलै २०२५ रोजी संघटना शिष्टमंडळास समायोजन प्रक्रिया व विविध मागण्याबाबत दिलेल्या आश्र्वासनाची पूर्तता न झाल्याने दि.२१ ऑगस्ट २०२५ पासून ग्रामीण रुग्णालय भोकर येथील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी होत आहेत. या बाबत डॉ. प्रताप चव्हाण वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय भोकर यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांनी निवेदन दिले. यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# गरीबाचे कैवारी मोदीजी !

## संपादकीय...

गरीबाना, गरीबीला जात, पात, धर्म नसतोच. पण हिंदू, मनू संस्कृतीने गरीब, श्रीमंत, दलित, सवर्ण, हिंदू, शिख, जैन, ख्रिश्चन, मारवाडी, गुजराती, मराठा अस्पृश्य, शुद्र वगैरे जातीत, धर्मा, धर्मात भारतीय महिला, पुरुषाना जखडून ठेवले. आजही जाती, धर्माचा पगडा वरचेवर मजबूत होताना दिसतो आहे. पूर्वीपेक्षा आजघडीला जातनिहाय महामंडळे, राजकीय पक्षाती जात, धर्मावर आधारीत पक्षनिहाय सेल स्थापन करुन ज्याना, त्यांना त्यांच्या, त्याच्या जात, धर्मात अडकवून ठेवले जात असून अशा धोरणात्मक कार्यप्रगतीतूनच भारताला महासत्ता भारत देश बनविण्यासाठी भारताचे विद्यमान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अहोरात्र कार्यरत असल्याने सर्वसामान्यातील खालच्या स्तरावरील नागरीकही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना मनस्वी धन्यवाद देताना दिसतात.

लाल किल्यावरुन स्वातंत्र्यदिनी बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी कळत न कळत पं. नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी ते खूद्द स्वतःच्या कार्याचा पूसटसा आलेख मांडला. कोणी काय केलं म्हणणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मागील पंतप्रधानाची गरीबासाठी गरीबी हटविण्यासाठी कांहीच केलं नाही म्हणतात, पण इतिहास साक्षीला आहे पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गोरगरिबाना कूजके धान्य पूरवितात, रोजगार बंद करतात, अदानी, अंबानीना बॅका, सरकारी तिजोरी खूली ठेवतात, त्याचे काय अशी ही प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे मग गरीबाचा कैवावरी रोजगार हमी योजना चालू करणारे, दूष्काळीत गरीबाना जगविणारे, बॅकांचे राष्ट्रीयकरण करुन गरीब श्रीमंत एकारेषेत आणू पाहणारे की अब्जावदी रुपयाला चूना लावणाऱ्याना परदेशात पळून जाण्यासाठी डोळं बंद करुन बसणारे मोदी सरकार गरीबाचे कैवारी कसे काय होतात अशी ही कुजबूज होताना दिसते आहे.

महागाई, भ्रष्टाचार, अन्नटंचाईबद्दल बोलताना मागील सरकारला दोष देताना आजच्या महागाई, भ्रष्टाचाराचा प्रधान मंत्री नरेंद्र मोदी उल्लेख करीत नाहीत पण लोकशाही मध्ये सर्वसामान्य जनतेसह सरकारची जबाबदारी काय असते या बद्दल बोलत नाहीत, महागडे अन्नधान्य गरीब, मध्यमवर्गीयाना परवडत नाही. महिला सबलीकरणाच्या नावाखाली कूटीर उद्योगासाठी महिलाना पाच, पन्नास हजाराचे कर्ज आणी इतराना कोट्याबधीची खैरात हेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याचे कार्य असले तरी गोर गरीबाच्या हाताला काम नाही रोजगार हा आयडीएल, तंत्रज्ञानात गेला तरी ही गरीब प्रतिकूल परिस्थितीस मुकाबला करण्यास सज्ज आहेत उपासमारीत जगण्याची त्यांची ताकद व सामर्थ हेच लोकशाहीच जीवंत लक्षण असल्याचे स्पष्ट करुन स्वतःला मोदीजी गरीबाचे कैवारी म्हणवून घेतात ही लाजीरवाणी नव्हे तर धाडसाची बाब म्हणावी लागेल असे सर्वत्र बोलले जाते आहे.

सर्जिकल स्टाईक असो की, ऑपरेशन सिंदूर ही लष्करी कारवाई यश असताना आम्ह जिंकलो मी केले म्हणून सांगणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कॉग्रेस राजवटीतील यूध्दे विसरलीत काय अशी ही लष्करी वर्तूळात कुजबूज होत असून तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यानी कॉग्रेसच्या सोनिया गांधी याना नेते संबोधल्याप्रकरणी सिंग याना मिंद्दे म्हणणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे लालखिल्ल्यावर भाषण ठोकताना राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या देशभक्तीला नतमस्तक होतात, ते मग कोणाचे मिंद्दे की गूलाम आहेत हे कोण सांगावे, महिला सक्षमीकरणाची भाषा बोलणे, लाडक्या बहीणीला १५०० रुपयात गुंडाळणे आणी गरीब मुलीच्या विवाहाप्रसंगी तिला सोन्याचे मंगळसूत्र ही मिळू नये एवढे सोने महाग करुन ठेवणे ही कसली अर्थव्यवस्था म्हणावी आणी मोदीजी दलित, अल्पसंख्याक, मागास, ओबीसी, गरीबाचे कैवारी म्हणावे यासाठी गरीबीची, गरीबाची व्याख्या बनविण्यासाठी कोणत्या शंकराचार्याची निवड करावी की स्वतः मोदीजीच विश्वगुरु बनल्यानंतर तेच गरीब म्हणजे काय ते सांगतील कोण जाणे.

## शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना

मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला. कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्र्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली.

या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला. नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली.

जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या. पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला.

या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसर्गाने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माझ्या मागल्या असेच चालू आहे. शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे.

मुबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्र्न निर्माण होतो.

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!!!

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४०वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा.नागपूरसाठी आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबतअशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून बडगा काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी स्वाभिमानाची बाब आहे. त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही.परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विग्घ निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले.मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ,शहरातील खड्डे,पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज,भ्रष्टाचारी, अत्याचारी,बेरोजगारी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो. आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४० कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्र्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## झरोका

एक – राज्यभर पावसाने कहर केला असला तरी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, त्या, त्या मतदार संघाचे आमदार मतदारसंघात फिरकत नाहीत, जनतेचे हालोहाल होत असतानाही लोकप्रतिनिधी मुंबईतच घिरट्या का मारीत असावेत हेच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी व्हीडीओ प्रणालीद्वारे राज्यभरातील जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक याची आढावा बैठक घेवून योग्य त्या न्यायीक सूचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे सतर्कता बाळगून जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी स्थानीक पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. अतिवृष्टीगत भागात आवश्यक ती मदत प्रशासन, स्थानीक प्रशासन आणी लष्कराच्या सहकार्याने नागरी सविधा पूरविल्या जात आहेत. मग स्थानीक लोकप्रतिनिधीची गरज काय ? तू कशाला काळजी करीत आहेस.

एक – अहो, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रालयात बसून राज्यभर लक्ष्य केंद्रीत करुन सर्व कांही न्यायीक कारवाई करु शकतात पण पालकमंत्री, आमदाराचे अशा संकटाला मुंबई काय काय म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, भाजपाच्या मंत्री आमदाराना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ताफ्यात राहाण्यासाठी धडपड असते तसेच शिंदे सेनेच्या मंत्री आमदाराना, अजितदादाच्या मंत्री, आमदाराना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार याच्या ताफ्यात राहावे वाटत असेल म्हणून ते तेथे असतील तूझे काय चालले आहे तेच कळत नाही.

एक – अहो, प्रत्येक आमदारानी, पालकमंत्र्यानी आपापल्या मतदारसंघात राहून सर्वसामान्य नागरीकांच्या दुःखात सहभागी व्हावे सरकारी मदत मिळवून द्यावी ही प्रत्येकाची अपेक्षा असते म्हणून मी बोलतोय, दुसरं काय.

दुसरा – अरे, स्थानीक जिल्हाधिकारी, तहसीलदार जेंव्हा नागरीकाना मदत वाटपासाठी गावोगांवी जातील त्यावेळी मी स्थानीक आमदार खासदार म्हणून फोटोत चेहरा दाखविण्यासाठीच लोकप्रतिनिधी हजर राहातील. पावसाचा कहरच काय मृत्यूचे तांडव झाले तरी आमदार, खासदाराना काय सुख, दुःख असते ते सुखी आहेत ना !

## काय बोलता राव ?

भ्रष्टाचार, लाचारी, चमचेगिरी, खाबूगिरी, लांगूणचालन, हूजरेगिरी, भडवेगिरी, पायचेपणी केल्याशिवाय हाती, पदरात कांहीच पडत नसते. मंदीरातील मूर्तीपेक्षा पूजाऱ्याची मनधरणी केल्यासच प्रसाद मिळत असतो म्हणूनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जसे सांगतात, त्यानुसार मुख्य निवडणूक आयूक्त ज्ञानेश कूमार हे खा. राहूल गांधी याचे आरोप मोडीत काढीत आहेत. कारण उद्याला निवृतीनंतर कांहीतरी सत्तापद मिळालेच हवे म्हणून खा. राहूल गांधी याना खोटे पाडण्यासाठीचा हा कूमार खटाटोप आहे. समजलं.

### काय बोलता राव !

अरे, यात काय नवल आहे. तत्कालीन मुख्य निवडणूक आयूक्त एम.एस. गील निवृत होताच त्यांना क्रिडा खात्याचे मंत्री करण्यात आले. शेरोशायरी करणारे राजेश कुमार ही सत्तापदावर गेले मग विद्यमान ज्ञानेश कूमार ही संवैधानिक पदावर जाण्यासाठी खऱ्याचे खोटे आणी खोट्याचे खरे करण्यासाठी स्वतःची अकार्यक्षमता ठरविण्यासाठी खा. राहूल गांधी यांच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेवून स्वतः ज्ञानेश कुमार हेच स्वार्थी, लाचार, अकार्यक्षम ठरवून घेत असतील तर त्यात त्यांचा मोठेपणाच ठरावा, गाढवाला गधा म्हटले काय आणी गाढवसाहेब म्हटले तरी त्यास उकिरडाच महत्वाचा असतो त्यासाठी मोदीजी बोले, गाढव हले हेच म्हणावे लागेल मग बोला दाजीबा !

## शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा एक अविस्मरणीय समारंभ संपन्न

लातूर – जगद्गुरू तुकोबाराय त्या काळातील खरे पत्रकार होते. तुकोबारायांनी ज्या विषयाला स्पर्श केला त्या विषयाचा अभ्यास आज सर्व धर्मातील तत्त्ववेता आजपण करत आहेत. त्यांनी सर्व समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न केले त्यांच्या लिखाणातून क्रांती घडली असे प्रतिपादन शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी अध्यक्षीय भाषणात ह.भ.प. महंब महादेव महाराज बोराडे शास्त्री म्हणाले. यावेळी उद्घाटक माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, कळंब धाराशिवचे आ. कैलास घाडगे पाटील, माजी महापौर दिपक सुळ, छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना देशमुख, जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे, संपादक भारत जाधव विचार मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलतांना महाराज म्हणाले की, लिखान करणार्याचे काम खुप मोलाचे असते म्हणूनच ज्या वेळी संताच्या विचाराने तरुण कर्म करू लागतील त्यावेळी ते विचार जगापुढे आदर्श ठरू लागतात. असे कर्म छत्रपती शिवाजी महाराजांनी करून दाखवले आहेत म्हणूनच जगाला संताचे विचारच वाचवु शकतात असे प्रतिपादन ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी आपल्या भाषणात केले.

यावेळी विनायराव पाटील म्हणाले की, या देशात लोकशाही आहे का असा प्रश्र्न पडत आहे सध्या न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारांनी प्रयत्न केला तरच लोकशाही वाचू शकणार आहोत या लोकशाहीत लोकांनी विचार करणे गरजेचे आहे असे म्हणाले. आ कैलास



घाडगे पाटील म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातून लातूरची निर्मिती झाली एका तालुक्याचा जिल्हा होतो आणि विकासात सर्वात पुढे जातो. विलासराव साहेबांचे नेतृत्व तुम्हाला लाभले, त्यामुळेच मोठा भाऊ मागे राहिला अन् लहान भाऊ पुढे गेला असे ते यावेळी म्हणाले.

दिपक सुळ म्हणाले की, बारा वर्षे पत्रकारिता क्षेत्रात टिकून राहणे सोपे नाही, पत्रकारितेच्या लेखणीची ताकद खूप मोठी आहे. आ. कैलास घाडगे पाटील जसे निष्ठावंत कार्यकर्ता होऊ शकतात तसाच मी पण अमितभैय्याचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे असे आपल्या अभ्यासु भाषणात म्हणाले. राज्यात सत्ताधार्यांनी विरोधी पक्ष शिल्लक ठेवला नाही ती भूमिका छावा संघटनेला बाहेरून पार पाडावी लागते व माझ्यावर हल्ला झाला लातूरसह राज्यात तीव्र निषेध नोंदवला परंतु लोकशाही मानणारे आम्ही अण्णासाहेबांचे छावे आहोत असे परखड मत छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी यावेळी मांडले. प्रत्येक प्रश्र्नाला वाचा फोडून न्याय देण्याची भूमिका या वृत्तपत्राने पार पाडली आहे यापुढेही रोखठोक भूमिका घेऊन आपण वाटचाल करावी अशी अपेक्षा करतो असे जेष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे म्हणाले. पुरस्कारर्थीकडून सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ यांनी आपले विचार मांडले.

या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यास गर्जा महाराष्ट्र माझा या गीताने व दिपप्रज्वलन करून सुरुवात झाली. तसेच जनतेच्या हक्काचं लातूर मिशन या गिताचा अनावरण सोहळा मान्यवराच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सौ. रेशमा गंभीरे सरपंच सिकंदरपूर, सुधाकर तेलंग अध्यक्ष लातूर विभागीय शिक्षण मंडळ, इसरार सगरे चेअरमन लातूर मल्टीस्टेट को. सोसायटी, डॉ. प्रो. आनंद पवार अधिष्ठाता कै. बी.व्ह. काळे आयुर्वेद महाविद्यालय, समाधान सुर्यवंशी क्षेत्रीय अधिकारी मनपा लातूर, सुनिल लाडके मंडळ अधिकारी बाभळगाव, ओमप्रकाश पवार उद्योजक मुरूड, दत्तात्रय परळकर संपादक समृद्ध व्यापार, सामना ढोल ताशा पथक लातूर यांना या वर्षीचा शिवरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तसेच विशेष सत्कार सुरेश काचबावार, डॉ. बालाजी वाघमारे, प्रा. तानाजी घुटे, कुमार भालेराव, गीतकार राजन सरवदे यांचा करण्यात आला. यावेळी अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला महिला वर्गासह प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक भारत जाधन यांनी केले तर सुत्रसंचलक बालाजी कांबळे यांनी केले शेवटी आभार दिपक बोराडे पाटील यांनी मानले.

## राज्य महोत्सवांतर्गत...

**(पान १ वरुन) :** गौरविले जाणार आहे. यासोबतच, महाराष्ट्रातील घरगुती गणपतीचे दर्शन, सार्वजनिक गणपतीचे दर्शन व विविध प्रसिध्द गणेश मंदिरातील गणपतींचे लाईव्ह दर्शन अकादमीच्यावतीने तयार करण्यात आलेल्या सरपशीर्हीर्री.श्रिवाझर. ले.ळप पोर्टलद्वारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्सवाचे छायाचित्र या पोर्टलद्वारे विनामूल्य प्रसिध्द करता येईल. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटूंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे सरपशीर्हीर्री.श्रिवाझर.ले.ळप या पोर्टलद्वारे प्रसिध्द करावी व सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता यावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे. विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम, गड किल्ले संवर्धन, राज्य व राष्ट्रीय स्मारकांचे जतन, विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन, देशी खेळांचे संवर्धन व प्रचार प्रसार, आरोग्य शिक्षण कला क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील कार्य, कायमस्वरुपी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम, वाचनालय, महिला सक्षमीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाच्या विज्ञानाच्या प्रचार व प्रसिध्दीचे कार्य, नवसंशोधन, पर्यावरण पूरक मूर्ती, सजावट व प्रदूषण रहित वातावरण अशा विविध बाबींच्या आधारे परीक्षण केले जाणार आहे.

## १०६ वर्षांची परंपरा - सहकाराच्या उज्वल भविष्याची दिशा

१०६ वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेली, सहकार क्षेत्रातील अग्रगण्य अशी संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे या शिखर संस्थेच्या अध्यक्षपदी मा.आमदार श्री. प्रवीण भाऊ दरेकर,गटनेते विधानपरिषद महाराष्ट्र राज्य यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल ऍड.प्रमोद सागर तायडे सरचिटणीस - मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (सहकार सेल) सचिव-मुंबई पूर्व उपनगरे जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशन मर्यादित,अध्यक्ष - समता फाउंडेशन यांनी मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यावेळी मान.नंदकूमार काटकर साहेब जेष्ठ संचालक मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक,उदय सर्वगोड आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

आपल्या सक्षम व दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील सहकार चळवळ नक्कीच नव्या उंचीवर पोहोचेल,तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी संघ,जिल्हा संघ व सर्व सहकारी संस्थांचा विकास साधला जाईल याची खात्री आहे. त्याचबरोबर,मानद सचिवपदी निवड झालेले मा.श्री.रामदास मोरे व उपाध्यक्षपदी निवड झालेले मा.श्री. अर्जुनराव बोरुडे यांचेही मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!करण्यात आले.

सहकार पॅनलचे श्री.संजीव कुसाळकर,श्री.शिवाजीराव नलावडे व सर्व मान्यवर सहकारी कार्यकर्ते तसेच पीठासीन अधिकारी मा.श्री. जगताप,मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रावळ,मुख्य अधिकारी श्री.बोडके,श्री मुळूक यांची या प्रक्रियेत उपस्थिती महत्त्वपूर्ण ठरली. सर्व नवीन पदाधिकारी व संचालक मंडळाला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

१०६ वर्षांची परंपरा - सहकाराच्या उज्वल भविष्याची दिशा महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची १०६ वर्षांची गौरवशाली परंपरा अधिक बळकट करण्यासाठी आपण सारे सहकार कार्यकर्ते एकदिलाने कटिबद्ध राहू या अशा ऍड.प्रमोद सागर तायडे सरचिटणीस मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (सहकार सेल)सचिव मुंबई पूर्व उपनगरे जिल्हा बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशन मर्यादित,अध्यक्ष समता फाउंडेशन यांनी मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**सागर तायडे यांस कडून**

# कॉर्पोरेट कंपन्यांनी दुर्गम व मागास जिल्ह्यांमध्ये काम करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : कॉर्पोरेट व खासगी संस्थांनी आपले सामाजिक उत्तरदायित्वाचे काम करताना शहरी भागावर लक्ष केंद्रित न करता दुर्गम आणि विकासाच्या दृष्टीने मागास जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक व सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम राबविण्यावर भर द्यावा. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तनाच्या नव्या टप्प्यात सर्वांनी एकत्र येत व्यापक आणि परिणामकारक परिवर्तन घडवून आणूयात, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पाचव्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी सिद्धिविनायक देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर, मुख्य सचिव राजेश कुमार, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, व्हीएसटीएफचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीणसिंह परदेशी, टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा, जेएसडब्ल्यू ग्रुपच्या संगीता जिंदाल, आयडीबीआयचे व्यवस्थापकीय संचालक राकेश शर्मा, जीआयसी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामास्वामी नारायणन, यांच्यासह गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एसटीएल लिमिटेडने तयार केलेल्या जलसंधारण कामाच्या अहवालाचे प्रकाशन तसेच लातूर येथील रावसाहेब पाटील शेतकरी उत्पादक कंपनीच्या वेअर हाऊसचे ई अनावरण करण्यात आले. दर्जा व्यवस्थापनासंदर्भात क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडिया आणि व्हिएसटीएफ यांच्यात तसेच 'हरित छत्रपती संभाजी नगर उपक्रम' राबविण्यासंदर्भात एसटीएल, व्हिएसटीएफ व छत्रपती संभाजी नगर महापालिका, सामाजिक वनीकरण विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, व्हीएसटीएफच्या पहिल्या टप्प्यात अनेक गावांमध्ये राबविलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून त्याच्या मूल्यमापनाचे परिणाम उत्साहवर्धक आहे. या टप्प्यात काही त्रुटी राहिल्या असल्या तरी त्या सुधारून दुसऱ्या टप्पा अधिक प्रभावीपणे राबवून तो यशस्वी करू. ग्राम परिवर्तन उपक्रमाची अंमलबजावणी करताना व्हीएसटीएफचे फेलोज गावातून बाहेर पडल्यावर तेथील परिवर्तनाचा वेग मंदावल्याचे आढळून आले




आहे. त्यामुळे या पुढील काळात गावातच उपलब्ध मनुष्यबळावर आधारित संस्थात्मक संरचना उभी करणे गरजेचे आहे. गावांमध्ये योजनांची अंमलबजावणी करताना प्रत्येक गावाची गरज ओळखून योजनांमध्ये बदल केल्यास परिवर्तनाची गती वाढेल.

व्हीएसटीएफ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात अनेक खासगी कंपन्यांनी व सामाजिक उत्तरदायित्व क्षेत्रातील भागीदारांनी केवळ आर्थिक सहाय्य नव्हे तर धोरणात्मक बदल, नवी तंत्रज्ञान, डेटा आधारित प्रक्रिया आणि नाविन्यपूर्ण उपाय सुचवून शासनाच्या प्रयत्नांना बळकटी दिली. हे परिवर्तन केवळ योजना राबवणे नव्हे, तर गावात समर्पित व्यक्तींची उपस्थिती, सामाजिक बांधिलकीने काम करणारे फेलोज आणि स्थानिक पातळीवर संस्था उभ्या करण्यावर लक्ष केंद्रित होते, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक खासगी भागीदारांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, सरकारी योजनांची सखोल माहिती व सहयोगाने गावोगावी उत्तम परिणाम साधता आला आहे. व्हीएसटीएफ आणि भागीदार असलेल्या खासगी कंपन्यांमुळे ग्राम विकास परिवर्तनात चांगले काम झाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या 'लखपती दीदी' योजनेचा राज्यात मोठ्या प्रमाणावर लाभ झाला असून, केवळ दोन वर्षांत महाराष्ट्रात ५० लाख महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. शासनाकडून त्यांना केवळ संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या असून त्याचे खरे श्रेय या महिलांचे आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

यावेळी टाटा ग्रुपचे अध्यक्ष नोवेल टाटा म्हणाले की, महाराष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी टाटा ग्रुप व टाटा ट्रस्ट नेहमीच राज्य शासनाला सहकार्य करेल. टाटा ग्रुपने सामाजिक उत्तर दायित्व निधीसाठी २० ते २५ टक्के वाटा ठेवला आहे. यामधून विदर्भ व इतर मागास भागातील सामाजिक, आर्थिक विकास क्षेत्रात काम करत आहे. याबरोबरच ग्रामविकास, जलसंधारण आदी क्षेत्रातही टाटा ग्रुप काम करत असून यासंदर्भात विविध शासकीय संस्थांबरोबर सामंजस्य करार केला आहे. त्याशिवाय मुख्यमंत्री वैद्यकीय मदत निधीसाठीही टाटा ग्रुप सहकार्य करत आहे. तसेच चंद्रपूर येथील कॅन्सर रुग्णालयासाठी निधी देत असून अमरावती व सोलापूरमधील शासकीय रुग्णालयालाही मदत करण्यात येत आहे.

जिंदाल ग्रुपच्या संगीता जिंदाल यांनी सांगितले की, जिंदाल समूहासाठी महाराष्ट्र हे राज्य महत्वाचे असल्याने राज्याच्या विकासासाठी नेहमीच पुढाकार घेत आहोत. जिंदाल समूहाच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील ५० गावांमध्ये परिवर्तनासाठी काम करणार आहे. त्याचबरोबर अलिबाग, चंद्रपूर जिल्ह्यासारख्या ठिकाणीही सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून कामे हाती घेणार आहे.

आयडीबीआयचे व्यवस्थापकीय संचालक राकेश शर्मा म्हणाले की, आयडीबीआयच्या व्यवसायात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. व्हीएसटीएफच्या सहकार्याने पाच जिल्ह्यातील १०४ गावांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवित आहोत. तसेच शासकीय रुग्णालयांच्या मदतीसाठी निधी देण्यात येत आहे. तसेच प्रत्येक ब्रँच गावातील एक शाळा व विभागीय कार्यालये ही प्रत्येकी एक रुग्णालय दत्तक घेऊन त्या ठिकाणी काम करणार आहे.

यावेळी श्री. परदेशी यांनी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनच्या पहिल्या टप्प्यातील कामकाजाची माहिती दिली. तसेच त्यामुळे झालेल्या परिवर्तनाचा आढावा सादर केला. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात ग्राम विकासासाठी मिशन महा कर्मयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यात यावा. मिशन कर्मयोगी उपक्रमाच्या माध्यमातून गावातील ग्रामस्तरावरील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे, असे श्री. परदेशी यांनी यावेळी सांगितले.

# बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा 'बैलपोळा'

बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय आणि ही कृतज्ञता या 'पोळा' सणाच्या निमित्ताने आम्ही भारतीय सातत्याने जोपासत आलेलो आहोत. भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमात्रांची देखील पूजा करायला शिकवते. अलीकडे खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या आडून पशुपालकांसह शेती करणारा शेतकरीवर्ग हा देशोधडीला लागलेला आहे, याची जाण शासनानी ठेवली पाहिजे. त्यातूनच त्याची दिवसेंदिवस होत असलेली कुचंबना व आत्महत्या ही योग्य नाही. जर जगवणाराच जर जगला नाही, तर एक दिवस स्वदेशीचा ठेंभा मिरवणाऱ्या भारतीयांना विदेशी अन्नाशिवाय जगणे कठिण होऊन बसेल हे विसरता येणार नाही.

'पोळा' हा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्याच्या दिवशी येतो या महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौंदर्यही खुलून दिसते. अशा या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणानंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण. संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' शेतकरी बांधवांसाठी पोळा या सणाचे महत्व खूप आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे. या दिवशी वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते. या सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेती मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. त्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

ज्यांच्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात. बैलपोळ्याचा सण हा शेतीवर आधारित आहे व हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्यांच्या कामी येणाऱ्या प्राण्यांचे महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणांस करवून देतो. पोळ्याच्या काळात शेतकरी शेतात बैल पाळत नाहीत आणि त्या दिवशी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शाळांना सुट्टी असते. फार प्राचीन परंपरेतील विशेषत: पशुपालक शेतकरी वर्गाने हजारो वर्षांपासून जोपासलेला पोळा हा सण. पशुपालन अवस्थे नंतर कृषक अवस्थेत आलेल्या प्राचीन मानव समूहाचाच हा सण. भूमी आणि भाकरीसाठी राबराब राबणाऱ्या श्रमसंस्कृतीचे ते प्रतीक आहे. शेतकरी व शेतमजूराचा सच्चा साथीदार म्हणजे बैल. हे तिन्ही घटकांची परस्पर पुरकता ही अन्नासह अर्थार्जन निर्मितीसाठी देशाचा मूख्य आधारस्तंभ ठरते.

आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर



आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणाच्या दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते व त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' म्हणायची पद्धत आहे, त्यानंतर 'मानवाईक' ज्याला गावात मान आहे ती व्यक्ति, गावचा पाटील किंवा श्रीमंत जमीनदार तोरण तोडतो व पोळा 'फुटतो' नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' देण्यात येतो, शेतकरी वर्गात हा सण महत्त्वाचा मानला गेल्याने या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण असते.

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देतो. या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात. या दिवशी शेतकरी आणि त्यांचे कुटुंब बैलांना धुणे, शिंगे रंगवणे, जुने दोर बदलून नवीन बांधणे, नवीन घंटा बांधणे आणि त्याचा साजशृंगार करतात. यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने किंवा तेलाने शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. बैलाच्या पाठीवर नक्षीकाम केलेली पाठीवर घालायची झुल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे व करदोड्याचे तोडे घालुन त्याला खायला सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. काही ठिकाणी बाजरी ची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते. सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतो, म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही. यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात. ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात व बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.

जेव्हा कोणताच धर्म अस्तित्वात आलेला नव्हता तेव्हा पासूनच प्राचीन भारतीय मानव समुदायाने बैलपूजनाची परंपरा जोपासलेली होती हे सिंधू संस्कृतीतील उत्खननातून सिद्ध झालेले आहे. बैल हे श्रमाचे प्रतीक, त्याच्याकडून वर्षभर काम करून घेत असतांना त्याच्या या ऋणाईतून उत्तराई होण्याचा हा दिवस म्हणून 'पोळा' हा सण साजरा करण्याची ही प्रथा ग्रामीण जीवनात कायम आहे. अलीकडे जरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे केली जात असली तरी बैलाचे महत्त्व जनमानसात आजही कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्यांचा सखा बणून राहणाऱ्या या बैलांच्या अपार श्रमातून देशातील तमाम मानवास रोजगार, अन्नधान्य व भोजन मिळते. परंतु या सणानिमित्त पळस या झाडांच्या फांद्या दारासमोर, गोठ्यात, शेतात ठेवण्याचीही परंपरा असल्यामुळे लाखो झाडांची तोड या दिवसावर होते. अवकाळी पाऊस, दुष्काळ या निसर्गाच्या लहरीपणातून शेतकरी व पशुपालकांचा जीव आधीच मेटाकुटीला आलेला असतांना त्यात अशा सणोत्सवाच्या निमित्ताने होणारी वृक्ष तोड योग्य नाही, पर्यावरणाचा ऱ्हास करणारी ही पळस तोड थांबायला हवी.

रक्ताचे पाणी करणारा शेतकरी आत्महत्या करतो, उपाशी झोपतो तर या मंदिरात देव-धर्माचे अवडंबर माजवणारा पुजारी, पुरोहित, पंडीत चैनीत तुपाशी खातो हे वास्तव म्हणजे या देशाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. या देशात गाय ही गोमाता ठरवली जाते, परंतु बैल पिता ठरत नाही. मंदिरात मात्र दान-दक्षिणा ऐटण्यासाठी गोमाता नव्हे तर नंदी बैलाचीच प्रतीकृती हवी असते ही विसंगती जोपासणारेच जर संस्कृती व धर्मरक्षक बणून मानवाच्याच जीवावर उठत असेल तर आमच्या धडावर आमचेच डोके व आमचाच मेंदू असल्याशिवाय खरी संस्कृती व खरा धर्म याची सत्यता कळणार नाही. कष्टाशिवाय व्यक्तीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही, सर्वांना बैल पोळ्याच्या अनेक शुभेच्छा !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## पूर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिला उपक्रमशील विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांचे प्रतिपादन

लातूर : जगात आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. आपल्या आयुष्यात कोणत्याही कामाच्या माध्यमातून मदत केली तर त्या मदतीचा समाजाकडून गौरव होत असतो. पूर्णवादी परिवाराने गौरव केलेल्या सर्वच महिलांनी आपापल्या क्षेत्रात चांगली कामे केली आहेत. त्याचा समाजाला भविष्यात निश्चित फायदा होईल, असे प्रतिपादन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.

पूर्णवादी नारी फोरमच्या वतीने सति सौभाग्यवती मनकर्णिका माता यांच्या मंदीराच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २० ऑगस्ट रोजी औसा रोडवरील गायत्री उत्सव हॉलमध्ये आयोजित 'गौरव कर्तृत्वाचा' या कार्यक्रमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख बोलत होत्या. यावेळी पूर्णवादी नारी फोरमच्या प्रमुख विभावरीताई कुलकर्णी, लातूर मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना, लातूर पूर्णवादी नारी फोरमच्या अध्यक्षा अमिता अशोक गोविंदपूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पूर्णवादी परिवाराच्या वतीने समाजातील वंचितांसाठी काम करणाऱ्या महिलांचा सन्मान आयोजीत करण्यात आला होता. प्रारंभी प. पू. पारनेरकर महाराज यांच्या स्मृतीला अभिवादन करून पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी शशीकांत देशमुख व वैशालीताई देशमुख यांनी अभंग गाऊन भक्तीमय वातावरण निर्माण केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक गोविंदपूरकर यांनी करून पूर्णवादी नारी मंचच्या वतीने आयोजीत सन्मानाबाबतची भूमिका विषद केली.

## मिशन शक्ती अंतर्गत पाळणा योजनेची राज्यात अंमलबजावणी - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

मुंबई : केंद्र शासनाच्या मिशन शक्ती अंतर्गत सामर्थ्य या



उपक्रमामध्ये महिलांना नोकरीदरम्यान मुलांची काळजी घेता यावी, यासाठी ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अंगणवाडीत पाळणा ही योजना सुरु करण्यात आली आहे. यामुळे कामगार व नोकरदार महिलांना मोठा दिलासा मिळणार असून मुलांच्या संगोपनासाठी सुरक्षित व दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात ३४५ ठिकाणी ही पाळणाघरे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पाळणाघरांमध्ये डे-केअर सुविधा, पूर्व शालेय शिक्षण, पूरक पोषण आहार, वाढीचे निरीक्षण, आरोग्य तपासणी, लसीकरण आदी सुविधा दिल्या जाणार आहेत. तसेच मुलांना दिवसातून तीन वेळा म्हणजेच सकाळचा नाश्ता, दुपारचे गरम शिजवलेले जेवण आणि संध्याकाळचा नाश्ता देण्यात येईल.

पाळणा घर महिन्यात २६ दिवस, दररोज ७.५ तास सुरु राहील, यामध्ये जास्तीत जास्त २५ मुले असतील. याठिकाणी एक पाळणा सेविका व एक पाळणा मदतनीस नेमण्यात येईल. वीज, पिण्याचे पाणी, बालस्नेही शौचालय यांसारख्या सुविधा उपलब्ध असणार आहेत.

या कार्यक्रमाअंतर्गत अंगणवाडी सेविका यांना १५०० प्रतिमाह भत्ता देण्यात येणार आहे. अंगणवाडी मदतनीस यांना ७५० प्रतिमाह, पाळणा सेविका मानधन यांना ५५०० प्रतिमाह, तर पाळणा मदतनीस यांना ३००० प्रतिमाह भत्ता देण्यात येणार आहे.

## डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनी सूत्रधाराचा शोध लावण्याची मागणी

भोकर (ता.प्रतिनिधी )महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाला २० ऑगस्ट २०२५ रोजी १२ वर्षे पूर्ण होत आहेत परंतु मुख्य सूत्रधार



आरोपीचा शोध सरकारला का लागत नाही असा सवाल अंधश्रद्धा निर्मूलन समिती व पुरोगामी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सरकारला करीत तहसीलदार भोकर यांना निवेदन सादर केले आहे.

सीबीआयने तपास करून पुणे विशेष न्यायालयात खटला दाखल केला सत्र न्यायालयाने आरोपी शरद कळस्कर, सचिन अंदुरे या दोघांना दोषी ठरवून शिक्षा दिली असे असले तरी खुणा मागचे सूत्रधार मोकाट आहेत. त्यांना पकडण्याचे धाडस शासन का करीत नाही ! कॉ.गोविंद पानसरे, प्रा.डॉ.एम.एम. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश यांच्या खुनाचे खटले न्यायालयात चालू आहेत परंतु खुना मागील सूत्रधार कोण यावर योग्य कारवाई होत नाही. डॉ. दाभोलकर खून खटल्यामध्ये आरोपी वीरेंद्र तावडे, संजय पुनाळेकर,विक्रम भावे यांची सुटका झाली या प्रकरणी सीबीआयने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली नाही याचा खेद वाटतो ! महाराष्ट्रात भोंदू बाबा जादूटोणाविरोधी कायदा मंजूर झाला तेव्हापासून दीड हजार भोंदू बाबांचा अंधश्रद्धा निर्मूलन समितीने पडदा फास केला देशभरात भोंदू बाबा मुळे बुवाबाजी वाढत असल्याने जादूटोणाविरोधी कायदा देशभरात लागू करावा कॉ. पानसरे, डॉ.कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या खुनी सूत्रधाराचा शोध लावून तात्काळ अटक करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर अंनिसचे तालुकाध्यक्ष एल.ए.हिरे, कार्याध्यक्ष कॉ.दिलीप पोतरे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गोविंद बाबा गौड, माजी सरपंच शिवाजी पांचाळ, पत्रकार सिद्धार्थ जाधव, लतिफ शेख महंमद रफी,गोविंद भालेराव, संजय जळपतराव,गोविंद देशमुख,चंद्रकांत मुस्तापुरे, एड.एडके, दत्तात्रय डोंगरे, सुरेखा माळे,शमिम बेगम, अनिता साबळे आदिसह अनेकांच्या सह्या आहेत

## बेस्ट पतपेढी निकालाने अनंत चतुर्दशीपूर्वीच उबाठा गटाच्या विसर्जनाची सुरुवात

मुंबई : बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीने उबाठा गटाचे अनंत चतुर्दशीपूर्वी विसर्जन सुरु झालं आहे. आगामी मुंबई महापालिकेत उबाठा गटाचे पूर्णपणे विसर्जन होणार आहे अशी खरमरीत टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी गुरुवारी केली. प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी 'सामना' मध्ये सोनिया गांधींचा उल्लेख 'करप्शन क्वीन' म्हणून केला होता. संजय राऊतांनी इंडिया अलायन्सच्या बैठकीत त्याच सोनिया गांधींचा उल्लेख मॅडम सोनिया गांधी असा करून बाळासाहेब ठाकरेंना खोटे पाडले, असा प्रहारही श्री. बन यांनी केला.

यावेळी श्री. बन म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीतून नवा श्रीगणेशा होतो या विश्लेषण पत्रकारांनी करायचे आहे. श्री. राऊत यांना मात्र या भेटीमुळे चांगलीच मिरची झोंबली आहे असा टोलाही त्यांनी लगावला. राज्याचे मुख्यमंत्री आणि दुस-या पक्षाच्या नेत्यांमध्ये भेटी, चर्चा होणे स्वाभाविक आहे. सातत्याने अशा भेटी महाराष्ट्रात झालेल्या आहेत. महाराष्ट्राची संस्कृती एकमेकांचा आदर ठेवण्याची आहे. विकासाच्या प्रश्नावर दोघे भेटले आहेत. या भेटीमधून लगेच राजकीय अर्थ काढायची गरज नाही असे श्री. बन यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस जेव्हा एखाद्या कामाचा श्रीगणेशा करतात, तेव्हा अनेक नेत्यांची साथ त्यांना लाभते. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना आशीर्वाद दिले आहेत. अडीच वर्ष उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मुंबई खड्ड्यात गेली होती. मात्र, त्याच काळात फडणवीस मुंबईत ठाण मांडून होते, लोकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी वेळ दिला. उद्धव ठाकरे यांच्यासारखा वेळ वाया घालवला नाही असा टोला त्यांनी लगावला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजमितीला राज्यात अनेक विकासकामांचा श्रीगणेशा केला आहे. त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि जनतेची उत्तम साथ मिळत आहे असेही त्यांनी नमूद केले.

# (गुरु वचन)
# आई-वडिलांना विसरु नका

खूप छान गोष्ट आहे. मुलगा आणि वडिलांच्या नात्याची. हल्ली आई-बाप मुलांना जड झाले आहेत. त्यांना वृद्धाश्रमात धाडले जात आहे. यावरच ही कथा आहे.

एकदा एक वयोवृद्ध बाप आपल्या उच्च शिक्षित मुलासोबत घराच्या छतावरती बसला होता. तेथे एक कावळा आला. मुलाला बापाने विचारले, ते काय आहे? मुलगा म्हणाला कावळा. पुन्हा दुसऱ्यांदा बापाने विचारले, ते काय आहे? मुलाने पुन्हा उत्तर दिले कावळा.

तिसऱ्यांदाही बापाने विचारले ते काय आहे? मुलाने जरासे दात-ओठ खात म्हटले, कावळा. मग ते दोघे घरात गेले. त्याला पुन्हा बापाने विचारले ते आत्ता आले होते ते काय होते? मुलाचा संयम सुटला होता त्याने ओरडत सांगितले, समजत नाही का? कावळा...... कावळा... कावळा.

पाचव्यांदा बापाने विचारले ते आपण पाहिले ते काय होते? मुलगा आता मात्र जाम भडकला त्याने त्यांना सांगितले, का टाईमपास करताय? तुम्हाला कितीदा सांगितले तो कावळा होता म्हणून, तरी तुम्हाला समजत नाही का? का जाणून- बुजून त्रास देताय?

मग त्या वयोवृद्ध बापाने त्या मुलाला घरातील एक डायरी आणायला सांगितली. त्याने ती आणली, त्यात हीच कथा लिहिली होती.

परंतु, ती थोडी वेगळी होती. त्या बापाच्या जागी एक लहान मुलगा होता. त्याने बापाला एक-दोन नाही तर तब्बल २५ वेळा हाच प्रश्न केला होता, आणि तितक्याच वेळा त्याच्या वडिलांनी त्याच्या प्रश्नाला हसत हसत उत्तर दिले.

त्यांना त्याच्या विचारण्याचा मुळीच राग येत नव्हता, उलट त्यांना त्या मुलाचा निरागस स्वभाव आणि त्याचे ते विचारणे आवडत होते. तो बाप त्या मुलाचाच होता जो त्याला केवळ पाच वेळा विचारल्यावर त्यांच्यावर खेकसला.

फरक फक्त हाच, की मुलासाठी बापाने केलेले कष्ट, त्यांनी सहन केलेल्या सर्व वेदना तो विसरला होता. उलट त्याने वडिलांना केवळ दु:खच दिले. लक्षात ठेवा. तुमच्या आई-वडिलांनी तुमच्यासाठी कितीतरी कष्ट केले आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी केवळ दु:खच देत आहात? आई-वडिलांना विसरू नका. त्यांनी केलेल्या कष्टांना विसरू नका.

# उपदेशकथा
# मातृभाषेचे महत्त्व

एकदा सरदार वल्लभभाई पटेल आपला मुलगा, सून व नातूसह महात्मा गांधींना भेटण्यास गेले होते. ते जेव्हा गेले तेव्हा गांधीजी जेवायला बसले होते. लहान मूल पाहताच त्याला गांधीजींनी एक गाकर दिला पण त्या बाळाच्या आईनं त्याच्या हातातून तो एकदम खेचून घेतला अन् ती त्याला म्हणाली, 'आधी थँक यू म्हण' पण ते लहान मूल काही 'थँक यू' म्हणेना. आईनं त्याला पुन्हा पुन्हा बजावलं, 'थँक यू' म्हण आधी तरच देईन गाकर.' शेवटी आपल्या बोबड्या बोलीत तो रागारागानं म्हणाला, 'ठेंकू !' हा तमाशा केव्हा संपतो त्याची गांधीजी वाटच पाहात होते. ते त्या बाळाच्या आईला म्हणाले, समुद्रालाच आग लागली तर सांगायचं कुणाला? तो एक दैवी कोपच समजायचा ना?' त्या बाईला काही गांधीजींचं म्हणणं उमजेना पण तिच्याजवळ असलेली दुसरी एक भगिनी म्हणाली, 'अहो, मुलाला तुम्ही गुजरातीऐवजी इंग्रजीत 'थँक यू' म्हणायला शिकवलंय ना, त्याच्यावर ही टीका आहे. बापूंची !' त्यावर गांधीजी म्हणाले, 'छे, छे मी टीका नाही करीत पण परभाषेच्या गुलामीचं विष किती खोल गेलंय याचा विचार करतो. ही मुलगी तर सरदार वल्लभभाईंची अर्थात एका देशभक्ताची सून. माझ्या दृष्टीनं हिला बिचारीला इंग्रजीचं फारसं ज्ञान नाहीच पण तरीसुद्धा आपल्या मुलाला इंग्रजी शब्द शिकवायचा तिचा असा दुराग्रहच असल्यावर कुणाला बोल लावायचा !' ते पुढे म्हणाले, 'जर आमच्या माताच हा भाषेचा गुंता उकलू शकल्या तर आपण मात्र इंग्रजीच्या बेडीतून मुक्त होऊ अन् मातृभाषा किंवा राष्ट्रभाषा यांचा विकास करू शकू.'

कथा उपदेश : इंग्रजीचे महत्त्व वाढते असले तरी मातृभाषा कमी महत्त्वाची नाही. तिचा उपयोग जास्तीत जास्त केला पाहिजे.

## शेतकरी कर्जमाफी व मराठा आरक्षणासाठी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन

लातूर:- या सरकारने शेतकऱ्याची दिशाभूल केली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी सध्या अडचणीत सापडला आहे.शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही.



सोयाबीनचा भाव साडेतीन हजाराच्या पुढे जात नाही. निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्याची कर्जमाफी करतो म्हणणारे मुख्यमंत्री सध्या गप्प बसले यामुळे महागाईने उच्चांक गाठला आहे. बळीराजा होरपळा जात आहे मराठा आरक्षणाची दग संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरली असून सुद्धा या सरकारला हे दिसत कसं नाही या सरकारला जाग करण्यासाठी आज संभाजी ब्रिगेडचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रमोद कदम, राजकुमार माने यांच्या नेतृत्वामध्ये हे लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

सरकार समोर या मागण्या प्रमुख मागण्या करण्यात आले शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी द्या, मराठा व इतर समाज बांधवांचा आरक्षणाचा मार्ग मोकळा करा, दुधाला प्रति लिटर ७० रुपये प्रमाणे भाव द्या, ऊसाला एफ आर पी प्रमाणे सात दिवसात रक्कम द्या.साखर कारखान्यावर दोष विरहित पारदर्शक दोषविरहित वजनकाटे बंधनकारक करा,अतिवृष्टी झाल्याने दुष्काळ जाहीर करा,हेक्टरी ५० हजार रुपये प्रमाणे नुकसान भरपाई द्या, व ईव्हीएम बंद करून बॅलेट पेपरवर देशाच्या निवडणुका घ्या या प्रमुख मागण्यासमोर करत आजही एक दिवसीय लक्षवेधी आंदोलन करून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात या मागणीचे निवेदन देऊन मुख्यमंत्र्यांनी या विषयाकडे सकारात्मक बघून तात्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्या असे नमूद करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव इर्शाद शेख, महानगराध्यक्ष गजानन जाधव, उद्योजक कक्षाचे जिल्हाध्यक्ष मिथुन दिवे, बळवंत चिंचोलकर,उत्तम फड, रमेश लाबोटे, जावेद मुजावर,सलीम पठाण सिद्धेश्र्वर तेलंगे, जिल्हा संघटक मेहबूब सय्यद, मोहनेश्र्वर विश्र्वकर्मा,राजकुमार भालेराव या पदाधिकाऱ्यांचे स्वाक्षरी निवेदन देण्यात आले.

# हिरवी मिरची खाण्याचे जबदस्त फायदे ठाऊक आहेत का?

भारतीय पदार्थामध्ये हिरव्या मिरचीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मिरचीमुळे अन्न झणझणीत आणि चविष्ट बनवण्यास मदत करते. हिरव्या मिरचीचे सेवन आरोग्यासाठीही चांगले मानले जाते. हिरव्या मिरच्या केवळ अन्नाची चव वाढवत नाहीत, तर अनेक आरोग्यदायी फायदेदेखील देतात. हिरव्या मिरच्यांमध्ये व्हिटॅमिन ए, बी६, सी, लोह, तांबे, पोटॅशियम, प्रथिने व कार्बोहायड्रेट्स, बीटा कॅरोटीन, क्रिप्टोक्सॅन्थिन, ल्युटीन झेक्सॅन्थिन यांसारखे पोषक घटक आढळतात, जे शरीराला अनेक फायदे देण्यास मदत करतात.



हिरवी मिरची खाण्याचे फायदे

हिरव्या मिरच्यांमध्ये व्हिटॅमिन-ए आढळते, जे दृष्टी सुधारण्यास व डोळे निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. हिरवी मिरची अँटी-ऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. हिरव्या मिरच्यांमध्ये भरपूर प्रमाणात आहारातील फायबर असतात, जे पचनासाठी फायदेशीर ठरू शकतात.

हिरव्या मिरचीमध्ये अँटीऑक्सिडंट्स गुणधर्म भरपूर असण्याबरोबर त्यात कॅलरीज नसतात, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. तसेच हृदय निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आहाराचे सेवन करणे खूप महत्वाचे आहे. दररोज हिरव्या मिरच्यांचे सेवन केल्याने हृदय निरोगी राहते.

मिरच्यांमध्ये आढळणारे कॅप्सेसिन हे संयुग शरीरातील वेदना कमी करू शकते. हे संयुग आपल्या मज्जासंस्थेत प्रवेश करते आणि वेदना कमी करते. हिरवी मिरची खाल्ल्याने ॲसिड रिफ्लक्समुळे जी छातीत जळजळ होते, त्यापासूनही आराम मिळू शकतो.

हिरवी मिरची खाणे हृदयाच्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. अनेक संशोधनांतून असे दिसून आले आहे की, हिरव्या मिरच्यांचे सेवन केल्याने शरीरात जमा होणारे वाईट कोलेस्ट्रॉल कमी होऊ शकते.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी हिरवी मिरचीदेखील चमत्कारिक मानली जाऊ शकते. हिरव्या मिरच्यांचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होण्यास मदत होते.

शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठीही हिरवी मिरची प्रभावी मानली जाऊ शकते. हिरव्या मिरच्यांमध्ये बीटा कॅरोटीन आणि व्हिटॅमिन सी जास्त प्रमाणात असते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून सदाशिव बडवणे यांना मिळाली उपचारासाठी १ लाख रुपयांची मदत ! - अलका पाटील

राज्यातील नागरिकांना आरोग्यपूर्ण जीवन लाभावे, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गरीब, गरजू रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. यामुळे त्यांच्यासाठी या योजनेच्या माध्यमातून मोठा आधार निर्माण झाला आहे. आजकालच्या धकाधकीच्या आयुष्यात अनेकदा आरोग्यपूर्ण जीवन जगताना अनेक अडचणी निर्माण होताना दिसत आहेत. अनेकदा एखाद्या कुटुंबावर अचानक गंभीर आजाराचा आघात होतो. रुग्णासह संपूर्ण कुटुंबाचा धीर खचून जातो. अशावेळी मुख्यमंत्री सहायता निधीतून रूग्ण व त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळताना दिसत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचाराकरिता अर्थसहाय्य करण्यात येत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळण्यासाठी रुग्णांना आता मुंबईला जाण्याची गरज राहिली नसून प्रत्येक जिल्हास्तरावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय कक्षाची स्थापना १ मे २०२५ पासून करण्यात आली आहे. रुग्णांना आता त्यांच्या स्वत: जिल्ह्यात उपचारासाठी मदतीसाठी अर्ज करता येणार असून अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहितीसुध्दा त्यांच्या जिल्ह्याच्या कक्षात मिळणार आहे.

नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत आहे. या कक्षमार्फत नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत या निधीच्या माध्यमातून ५३९ रुग्णांना मदत केली आहे. यासाठी ४ कोटी ४२ लाख २४ हजार एवढा निधी वितरीत करण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय नांदेड कक्षाच्यावतीने दिली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या या कक्षाच्या माध्यमातून मदत घेतलेल्या रुग्णांकडून याबाबत त्यांच्या शब्दात त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात येत आहेत. यावेळी आपण नांदेड तालुक्यातील पिंपळगाव कोरका येथील रुग्ण सदाशिव गणेशराव बडवणे वय वर्षे ५५ यांच्या कुटूंबियाच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्यांचा मुलगा राहुल यांनी सांगितले की, वडिलांना एके दिवशी अचानक ताप आला मग त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता नांदेड येथे श्री गंगा हॉस्पिटल यांनी ताप मेंदुला गेला असल्याचे सांगितले. यासाठी त्यांना बराच खर्च येणार होता. यावेळी त्यांच्याकडे पैशाची व्यवस्था नव्हती. त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असून अल्पभुधारक शेतकरी आहेत. अशाच परिस्थितीत अचानक आजारपण यामुळे कुटूंबातील कर्ता माणूस आजारी पडल्यामुळे कुटूंबातील इतर सदस्यांना पैशाची जुळवाजुळव करण्यासाठी खूप धावपळ करावी लागली. यातच रुग्ण कोमात गेला. त्यानंतर श्री गंगा हॉस्पिटल नांदेड येथे त्यांच्यावर १७ ते १८ दिवस उपचार करण्यात आले. यावेळेस त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मदतीसाठी अर्ज केला व सर्व कागदपत्रांची पूर्तता केली. त्यानंतर त्यांचा अर्ज तात्काळ मंजूर होवून त्यांना मदत कक्षाकडून १ लाख रुपयांची मदत मिळाली. या मदतीमुळे त्यांच्यावर यशस्वी उपचार करुन ते यातून सुखरुप बरे झाले व घरी परतले आहेत.

या मदत निधीमुळे त्यांचा मुलगा राहुल व मुलगी जयश्री, पत्नी पार्वतीबाई बडवणे यांनी महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून मदत मिळाल्यामुळे त्यांच्या वडीलांचे जीव वाचला याबाबत त्यांनी मनापासून आभार मानले. गरजू व पात्र लाभार्थ्यांना या मदतीमुळे खूप मोठा आधार मिळत असून ही मदत गरजू रुग्णांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरत आहे.

# लातूर शहरात मंडप, पेंडॉल तपासणीसाठी पथके गठीत

लातूर, (जिमाका): मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सण, गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, समारंभप्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप, पेंडॉलच्या तपासणीसाठी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही पथके लातूर महानगरपालिका हद्दीमधील मंडप, पेंडॉल तपासणी करणार असल्याची माहिती लातूरच्या उपविभागीय दंडाधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी दिली.

एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक समाधान चावरे (दूरध्वनी क्र. २२०१००, भ्रमणध्वनी क्र. ९६३७१६५५२६, ई-मेल आयडी ps.midc. laturmahpolice.govi.in), लातूरचे नायब तहसीलदार सतिष कांबळे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ९५४५२९२९०१, ई-मेल आयडी- laturtahsildargmail. com), लातूर महानगरपालिका ए झोनचे सहायक आयुक्त बंडू किसवे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९०११०३२३०२, ई-मेल आयडी ालश्रर्रीीसारळश्र.लो) यांचा समावेश असणार आहे.

शिवाजी नगर पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक दिलीप सागर (दूरध्वनी क्र. २४३१००, भ्रमणध्वनी क्र. ९५५२६६४३००, ई-मेल आयडी- psshivajinagargamil. com), नायब तहसीलदार गणेश सरोदे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ७५८८५३३१८४, ई-मेल आयडी- laturtahsildargmail. com), लातूर महानगरपालिकेचे बी झोन अधिकारी संतोष लाडलापुरे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९४२३७१९००१, ई-मेल आयडी- mclaturgmail.com) यांचा समावेश आहे.

विवेकानंद चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक संतोष पाटील (दूरध्वनी क्र. २५८१००, भ्रमणध्वनी क्र. ९९२३८७१९९९, ई-मेल आयडी- psgandhichauk405gamil. com), नायब तहसीलदार परमेश्र्वर कांबळे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ९४२१४००२५१, ई-मेल- आयडी- laturtahsildargmail. com), लातूर महानगरपालिका सी झोन अधिकारी समाधान सूर्यवंशी (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९४०४२२५३७९, ई-मेल- mclaturgmail.com) यांचा समावेश राहील.

गांधी चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड (दूरध्वनी क्र. २४२१००, भ्रमणध्वनी क्र. ८७६७६१७८८४, ई-मेल आयडी- psgandhichauk405gamil. com), नायब तहसीलदार गणेश अंबर (दूरध्वनी क्र. २४३४६२, भ्रमणध्वनी क्र. ७५८८६९२४६१, ई-मेल आयडी- laturtahsildargmail.com), महानगरपालिका डी झोन सहाय्यक आयुक्त विजय राजुरे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ८८०६८२२४६२, ई-मेल आयडी- mclaturgmail.com यांचा समावेश आहे.

## पालघर जि. प. माजी अध्यक्ष प्रकाश निकम, माजी नगराध्यक्ष नंदकुमार पाटील यांचा भाजपामध्ये प्रवेश

मुंबई : पालघर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम, पालघरचे माजी नगराध्यक्ष व शरद पवार गटाचे नेते नंदकुमार पाटील, त्यांच्या पत्नी रेश्मा पाटील यांनी अनेक समर्थकांसह गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी भाजपा पालघर जिल्हाध्यक्ष भरत राजपूत, बाबाजी कारोळ, विवेक कलमाडा आदी उपस्थित होते. यावेळी काँग्रेस, उबाठा गट आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या १० माजी जिल्हा परिषद सदस्य, ५२ सरपंच आणि उपसरपंच, १२३ ग्राम पंचायत सदस्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला .



यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्र्वासक नेतृत्वाखाली वेगाने विकासकार्ये सुरू आहेत. विकासाच्या राजकारणाला साथ देण्यासाठी भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांचा विश्र्वास अबाधित ठेवू.

पालघर जिल्ह्यातून भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये माजी मंत्री शंकर नम यांचे पुत्र सुधीर नम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार राजाराम ओझरे यांचे पुत्र सुधीर ओझरे, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सारिका निकम, शिरगावचे जि. प. सदस्य घनश्याम मोरे, सरपंच पौर्णिमा धोडी, सरावली चे सरपंच आनंद धोडी, जव्हारचे माजी सभापती चंद्रकांत रंधा, माजी युवासेना प्रमुख रिकी रत्नाकर, संघटक प्रकाश सांबर यांचा समावेश आहे.

## राशीभविष्य २२ ऑगस्ट २०२५

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण
धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

मिथुन:शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

कर्क :शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल. कार्यक्षमता वाढणार आहे. स्वत:च्या बुद्धीने कामे करा. विरोधकांपासून सावध रहा. कुटुंबात सहकार्याचे वातावरण राहील.

सिंह : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व
आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

कन्या : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर
व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

तुळ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: पश्चिम
बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

वृश्चिक : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

धनु: शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: उत्तर
कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

मकर: शुभ रंग :केसरी,शुभ दिशा:पूर्व
कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

कुंभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण
व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील. कौटुंबिक समाधान मिळेल.

मीन : शुभ रंग : निळा, शुभ दिशा :पश्चिम
चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल.

## इतिहासात आजचा दिवस २२ ऑगस्ट २०२५

अंतरराष्ट्रीय

१६४२ - इंग्लंडमध्ये यादवी युद्धाची सुरुवात.

१८६४ - जीन हेन्री ड्युनॉट यांनी आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटनेची स्थापना केली.

१८८६ - बुचाचा पोषाख परिधान करून विल्यम केंडालने नायगारा धबधब्याखालचा खळाळता प्रावह पोहून पार केला.

१९११ - लिओनार्डो दा विंची यांचे सुप्रसिद्ध पेंटिंग 'मोनालिसा' पॅरिसच्या लुव्ह संग्रहालयातून चोरीस गेले.

१९३२ - बीबीसी दूरचित्रवाणी सेवा नियमित सुरू झाली.

१९६६ - रशियन अवकाशयान ल्यूना-११ चंद्राच्या दिशेने झेपावले. त्याने चंद्राच्या पृथ्वीवरून दिसत नसलेल्या भागाची चित्रे घेऊन ती पृथ्वीवर पाठवली.

२००७ - ढाका विद्यापीठात उसळलेला विद्यार्थ्यांच्या हिंसाचारामुळे ढाकासह सहा शहरांमध्ये अनिश्चितकाळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली.

राष्ट्रीय

१९०३ - ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा, असे आवाहन पुण्यात विद्यार्थ्यांच्या सभेत लोकमान्य टिळकांनी केली.

१९२१ - महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाने परदेशी कपड्यांची होळी.

जन्म

१९१५ - शंभु मित्र, अभिनेता व नाट्यदिग्दर्शक.

१९१९ - गिरीजाकुमार माथूर , हिंदी कवी.

१९३३ - गोपीकृष्ण, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नर्तक.

निधन

१८१८ - वॉरन होस्टिंग्ज, ईस्ट इंडिया कंपनीचे गव्हर्नर जनरल.

१९८२ - एकनाथजी रानडे, विवेकानंद केंद्राचे आद्यप्रवर्तक.

१९९९ - सूर्यकांत मांढरे, मराठी चित्रपट अभिनेते.

२००१ - शरद तळवलकर, मराठी विनोदमुर्ती.

## सरकार साखर उद्योगाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे- सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

पुणे - सरकार साखर उद्योगाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी पुणे येथे केले. पुणे येथे वेस्ट इंडिया शुगर मिल्स असोसिएशन, पुणे आयोजित साखर जैवऊर्जा उद्योगाच्या नवीन क्षितिजावरील तांत्रिक चर्चासत्रास सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष बी.बी ठोंबरे, महासचिव डॉ.पांडुरंग राऊत, डीएसटीए अध्यक्ष शहाजीराव भड, साखर आयुक्त सालीमठ, यशदा पुणे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे, कृषी शास्त्रज्ञ डॉ.बाळकृष्ण जगदगनी, जैव ऊर्जा तज्ञ डॉ.संजय पाटील तसेच खाजगी आणि सहकारी कारखान्याचे चेअरमन, एमडी व अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की,महाराष्ट्रातील साखर उद्योग देशातील एक क्रमांकाचा उद्योग असून ग्रामीण अर्थकारणाचा कणा आहे. १९९८ नंतरच्या साखर उद्योगाचे विनियंत्रणानंतर गेल्या २५ वर्षात महाराष्ट्रामध्ये खाजगी क्षेत्रामधील साखर कारखान्याची संख्या प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली. आज जवळपास १३३ साखर कारखाने खाजगी क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत व महाराष्ट्रातील एकूण साखर उत्पादनाच्या ५० टक्के साखर उत्पादन, ७० टक्के इथेनॉल उत्पादन व ६० टक्के कोजन पावर यांचे उत्पादन या खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांकडून होते. वास्तविक पाहता खाजगी क्षेत्रातील साखर कारखानेसुद्धा १०० टक्के शेतकऱ्यांच्या मालकीचे आहेत.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894